# भारतातील गिग अर्थव्यवस्था: रोजागारातील लवचिकाता, उत्पन्न स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षा: एक समीक्षात्मक अभ्यास

**संशोधक:**

**सचिन विजय शिवधारकर**

**स्व. छगनलालजी मुलजीभाई कढी कला व विज्ञान महाविद्यालय, अचरपुर कॅम्प**

sachinshivdharkar@gmail.com

**मार्गदर्शक:**

**डॉ. आर. आर. चव्हान**

**स्व. छगनलालजी मुलजीभाई कढी कला व विज्ञान महाविद्यालय, अचरपुर कॅम्प**

**सारांश:**

डिजिटल तंत्रज्ञान, ऑनलाईन प्लॅटफॉर्म आणि मागणीनुसार आणि उपलब्ध होणाऱ्या सेवांच्या विस्तारामुळे रोजगाराच्या स्वरूपात मोठे परिवर्तन झाले आहे. या परिवर्तनाचा महत्वाचा परिणाम म्हणले गिग अर्थव्यवस्था आणि प्लॅटफॉर्म आधारित कामाचा विस्तार. भारतात खाद्यपदार्थ वितरण, प्रवासी वाहतूक, लॉजिस्टीक्स, घरगुती सेवा, ऑनलाईन फ्रीलांन्सिंग आणि इतर सेंवामध्ये गिग कामगारांची संख्या वाढत आहे, गिग कामामुळे रोजगारातील लवचिकता, प्रवेशाची सुलभता आणि अतिरिक्त उत्पन्नाच्या संधी उपलब्ध होतात, पंरतू त्याच वेळी उत्पन्नातील अनिश्चितता, दीर्घ कामाचे तास, रोजगार असुरक्षितता, अल्गोरिदमिक नियंत्रक आणि सामाजिक सुरक्षेचा मर्यादित प्रवेश यांसारख्या समस्या दिसून येतात.

या समीक्षा लेखात गिग अर्थव्यवस्थेवरील उपलब्ध संशोधनाचा रोजगारातील लवचिकता, उत्पन्न स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षा या तीन प्रमुख आर्थिक आयामांच्या संदर्भात आढावा घेण्यात आला आहे. २०१९ ते २०२६ या कालावधीत भारत केंद्रित तसेच आंतरराष्ट्रीय महत्वाच्या अभ्यासांचा विचाार करण्यात आला आहे. उपलब्ध साहित्याच्या विश्लेषणातून असे दिसून येते की रोजगारातील लवचिकता ही गिग कामाची प्रमुख आकर्षक बाब असली तरी ती नेहमीच आर्थिक स्थैर्य किंवा वास्तविक स्वायत्ततेमध्ये रूपांतरीत होत नाही. विशेषत: भारतातील खाद्य वितरण व वाहतूक क्षेत्रातील कामागारांमध्ये उत्पन्नातील चढ—उतार, कामाशी संबंधित खर्च आणि सामाजिक सुरक्षा यांचा प्रश्न महत्वाचा आहे.

समीक्षेत पुढील संशोधनासाठी काही महत्वपुर्ण पोकळी स्पष्ट झाल्या आहेत. महानगरांबाहेरील जिल्हास्तरीय अभ्यासांची कमतरता, उत्पन्न—खर्च—बचत—कर्ज—सामाजिक सरुक्षा यांचा एकत्रित आर्थिक अभ्यासाचा अभाव आणि रोजगारातील लवचिकता व उत्पन्न स्थैर्य यांच्यातील परस्परसंबंधावर मर्यादित परिणामात्क संशोधन या प्रमुख पोकळ्या आहेत.

**मुख्य शब्द:**

गिग अर्थव्यवस्था, प्लॅटफॉर्म कामगार, रोजगारातील लवचिकता, उत्पन्न स्थैर्य, सामाजिक सुरक्षा, अग्लोरिदमिक व्यवस्थापन.

## १. प्रस्तावना:

डिजिटल तंत्रज्ञान आणि प्लटफर्ाम आधारित सेवांच्या वाढीमुळे पारंपारिक रोजगाराच्या स्वरूपात महत्वपूर्ण बदल होत आहेत. अल्पकालीन, कामानुसार किंवा कार्यानुसार उपलब्ध होणारे रोजगार, फ्रीलान्स काम आणि डिजिटल प्लॅटफॉर्ममार्फत ग्राहक व कामगार यांना जोडणारी व्यवस्था यांना व्यापक अर्थाने गिग अर्थव्यवस्थेचा भाग मानले जाते. गिग अर्थव्यवस्थेमध्ये कामगारांना स्वत:च्या सोयीनुसार काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे बेरोजगार, अर्धवेळ काम शोधणारे किंवा अतिरिक्त उत्पन्न मिळवू इच्छिणारे व्यक्ती या क्षेत्राकडे आकर्षित होतात. मात्र, कामाचे प्रमाण प्लॅटफॉर्मवरील मागणीवर अवलंबून असल्यामुळे उत्पन्नात अनिश्चितता निर्णान होऊ शकते. त्याचबरोबर रेटिंग, प्रात्साहन योजना, कामाचे वाटप आणि दंड यांसारख्या डिजिटल प्रणाली कामगारांच्या प्रत्यक्ष स्वायत्ततेवर परिणाम करू शकतात. भारताच्या संदर्भात हा विषय महत्वाचा आहे. निती आयोगाच्या २०२२ च्या अहवालानुसार २०२० ते २१ मध्ये भारतात सुमारे ७७ लाख गिग कामगार होते आणि भविष्यात या कामगारसंख्येत मोठी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे गिग अर्थव्यवस्था ही केवळ तंत्रज्ञानाशी संबंधित नसून रोजगार, उत्पन्न, सामाजिक सुरक्षा, श्रमबाजार आणि सार्वजनिक धोरण यांच्याशी निगडित महत्वची आर्थिक घटना आहे.

## २. अभ्यासाची उद्दिष्टे:

१. गिग अर्थव्यवस्था आणि गिग कामगारांवरील उपलब्ध संशोधनाचा आढावा घेणे.

२. रोजगारातील लवचिकता आणि कामगारांच्या स्वायत्ततेचे विश्लेषण करणे.

३. गिग कामगारांच्या उत्पन्नातील स्थैर्य व आर्थिक शाश्वततेशी संबंधित निष्कर्षांचा अभ्यास करणे.

४. सामाजिक सुरक्षा, रोजगार संरक्षण आणि कामाच्य परिस्थितीवरील संशोधनाचा आढावा घेणे.

५. भारतीय गिग अर्थव्यवस्थेतील प्रमुख संशोधन विषय, पध्दती आणि संशोधन पोकळी ओळखणे.

६. भविष्यातील आर्थिक संशोधनासाठी दिशा सुचवणे.

**३. संशोधन पध्दती:**

या लेखासाठी संरचित साहित्य समीक्षा पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. Gig Economy, Gig Workers, Gig Work, Platform Workers, Platform Economy, Digital Labour, Platform Work, Gig Workers AND India, Gig Economy AND India, Gig Workers AND Income, Gig Workers AND Social Security आणि Gig Workers AND Employment Flexibility' यांसारख्या की–वर्डच्या आधारे संबंधित साहित्याचा शोध घेण्यात आल.

समीक्षेमध्ये peer-reviewed journal articles, systematic review papers, conceptual studies आणि भारत–केंद्रित empirical studies यांना प्राधान्य देण्यात आले. साहित्याचे वर्गीकरण रोजगारातील लवचिकता, उत्पन्न व आर्थिक स्थैर्य, कामाची गुणवत्ता, सामाजिक सुरक्षा, अल्गोरिदमिक नियंत्रण, लिंग आणि आर्थिक वर्तन या प्रमुख आयामांमध्ये करण्यात आले.

**४. निवडक संशोधन साहित्याचा आढावा:**

| अ. क्र. | लेखक/वर्ष | संशोधन लेख | जर्नल | अभ्यासाचा केंद्रबिंदू | प्रमुख निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | Wood et al. (2019) | Good Gig, Bad Gig: Autonomy and Algorithmic Control in the Global Gig Economy | Work, Employment and Society | लवचिकता,स्वायत्तता, अल्गोरिदमिक नियंत्रण | लवचिकतेसोबत नियंत्रण, कमी वेतन आणि अनियमित कामाचे स्वरूप दिसून आले. |
| २ | Duggan et al. (2020) | Algorithmic Management and App-work in the Gig Economy | Human Resource Management Journal | अल्गोरिदमिक व्यवस्थापन | अल्गोरिदममुळे रोजगार संबंध आणि कामगारांवरील नियंत्रणाचे स्वरूप बदलते. |
| ३ | Vallas & Schor (2020) | What Do Platforms Do? Understanding the Gig Economy | Annual Review of Sociology | प्लॅटफॉर्म, असुरक्षितता, उद्योजकता | प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेत संधीसोबत नवीन प्रकारची असुरक्षितता व नियंत्रण निर्माण होते. |
| ४ | Dunn (2020) | Making Gigs Work: Digital Platforms, Job Quality and Worker Motivations | New Technology, Work and Employment | कामाची गुणवत्ता, कामगार प्रेरणा | कामगारांची प्रेरणा आणि कामाची गुणवत्ता गिग अनुभवावर प्रभाव टाकतता. |
| ५ | O'Farrell & Montagnier (2020) | Measuring Digital Platform-mediated Workers | New Technology, Work and | कामगारांचे मापन | प्लॅटफॉर्म कामगारांची अचूक व तुलनात्मक संख्या मोजणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Employment | | आव्हानात्मक आहे. |
| ६ | Rani & Dhir (2020) | Platform Work and the COVID-19 Pandemic | Indian Journal of Labour Economics | असुरक्षितता, सामाजिक सुरक्षा | COVID-19 काळात प्लॅटफॉर्म कामगारांची असुरक्षितता प्रकर्षाने दिसून आली. |
| ७ | Pant & Majumdar (2022) | Themes and Narratives of Gig Economy: An Indian HR Perspective | NHRD Network Journal | भारतीय गिग अर्थव्यवस्था | श्रोजगार HR आणि कामगार संबंधित प्रश्न प्रमुख असल्याचे आढळले. |
| ८ | Ghosh, Zaidi & Ramachandran (2022) | Locating Women Workers in the Platform Economy in India | Gender & Development | लिंग, लवचिकता, असुरक्षितता | महिलांना लवचिकतेचा फायदा असला तरी सुरक्षा, काळजीची जबाबदारी व अस्थिरता कायम आहे. |
| ९ | Sinha & Pandit (2023) | Assessing the Economic Sustainability of Gig Work: A Case of Hyper-local Food Delivery Workers in Kolkata, India | Research in Transportation Economics | उत्पन्न, कामाचे तास, आर्थिक शाश्वतता | दीर्घ कामाचे तास व अस्थिर उत्पन्नामुळे आर्थिक शाश्वततेवर प्रश्न निर्माण होतात. |
| १० | Nair (2023) | The Political Economy of Gig Work in the Pandemic | Contributions to Indian Sociology | उत्पन्न, नियंत्रण, महामारी | महामारीत उत्पन्नात घट व कामगारांवरील नियंत्रण वाढले. |
| ११ | Masta & Kaushiva (2024) | Work in the Platform Economy: A Systematic Literature Review | Employee Relations | २५८ अभ्यासांचे systematic review | कामाची परिस्थिती, आर्थिक परिस्थिती व अल्गोरिसमिक व्यवस्थापन हे प्रमुख संशोधन विषय |
| १२ | Ray et al. (2024) | Jobs and Careers in the New Normal: A Systematic Review of GIG Work Research Since the Covid-Pandemic | South Asian Journal of Management | ५९ अभ्यासांचे systematic review | कल्याण, तंत्रज्ञान, work-life balance आणि विविधता प्रमुख विषय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | Alauddin et al. (2024/25) | The Influence of Digital Platforms on Gig Workers: A Systematic Literature Review | Heliyon | PRISMA systematic review | डिजिटल प्लॅटफॉर्म संधी निर्माण करतात, परंतू अनेक जोखीमही निर्माण करतात. |
| १४ | Malhotra & Agrawal (2025) | Dislike and Survival: Work-Related Dynamics of Gig Platform Workers in India | New Technology, Work and Employment | ३६ भारतीय कामगार; गुणात्मक अभ्यास | कमी उत्पन्न, नियंत्रणाचा अभाव आणि उपजीविकेची प्लॅटफॉर्मवर अवलंबित्व दिसून आले. |
| १५ | Faras, Mehta & Datta (2025) | Platform-based Gig Work in India's Labour Statistics | Indian Journal of Labour Economics | कामगार सांख्यिकी | सध्याच्या श्रम सांख्यिकीमध्ये प्लॅटफॉर्म कामगारांचे योग्य मापन होत नाही. |
| १६ | Medappa (2025) | 'Lived Capitalisation': How Speculative Finance Shapes the Social and Financial Lives of 'Gig' Workers in Bengaluru, India | Work, Employment and Society | आर्थिक वर्तन, जोखीम | गिग कामगारांच्या आर्थिक जीवनात गुंतवणूक व आर्थिक जोखीम महत्वाची आहेत. |
| १७ | Sharma & Sharma (2025) | The Gig Economy and the Evolving Nature of Work in India | Journal of Digital Economy | २३ दिल्लीतील कामगार; मुलाखती | रोजगाराच्या संधीसोबत उत्पन्न व रोजगार सुरक्षेच्या समस्या आहेत. |
| १८ | Ramakrishnappa (2026) | Booming Gig Workforce in India: Opportunities and Challenges | World Journal of Advanced Research and Reviews | दुय्यम माहिती / समीक्षा | गिग workforce वाढत असताना सामाजिक सुरक्षेचे प्रश्न कायम आहेत. |
| १९ | Afsharinia & Gurtoo (2026) | Cross-sectional Dataset of Low- and Semi-skilled Gig Workers in India | Data in Brief | Cross-sectional dataset | भारतीय गिग कामगारांच्या आर्थिक व सामाजिक असुक्षिततेसाठी उपयुक्त माहिती उपलब्ध होते. |

**८. विषयानुसार साहित्य समीक्षा:**

**५.१ रोजगारातील लवचिकता आणि स्वायत्तता**

गिग कामाचे प्रमुख आकर्षण म्हणजे कामाच्या वेळेबाबत तुलनेने अधिक लवचिकता. मात्र Wood et al. आणि Dunn यांच्या अभ्यासातून असे दिसते की ही लवचिकता अल्गोरिदमिक नियंत्रणासोबत अस्तित्वात असू शकते. त्यामुळे औपचारिक लवचिकता आणि वास्तविक स्वायत्तता यांमध्ये फरक करणे आवश्यक आहे.

**५.२ उत्पन्न स्थैर्य आणि आर्थिक शाश्वतता**

भारतीय साहित्यामध्ये उत्पन्नातील अनिश्चितता हा प्रमुख प्रश्न आहे. Sinha आणि Pandit यांच्या कोलकाता अभ्यासात खाद्य वितरण कामगारांचे दीर्घ कामाचे तास आणि अस्थिर उत्पन्न अधोरेखित झाले आहे. आर्थिक विश्लेषण करताना केवळ एकूण उत्पन्न न पाहता इंधन, देखभाल, प्लॅटफॉर्म संबंधित खर्च, प्रतीक्षा वेळ आणि इतर कामाशी संबंधित खर्च विचारात घेणे आवश्यक आहे.

**५.३ कामाची गुणवत्ता आणि कामाच्या परिस्थिती**

गिग कामामुळे रोजगारात प्रवेशाची संधी वाढते; परंतु दीर्घ कामाचे तास, कामाचा ताण, अनिश्चित मागणी आणि मर्यादित सौदेबाजी शक्ती यामुळे कामाची गुणवत्ता कमी होऊ शकते.

**५.४ सामाजिक सुरक्षा आणि रोजगार संरक्षण**

आरोग्य विमा, पेन्शन, सशुल्क रजा, बेरोजगारी संरक्षण आणि अपघात भरपाई यांसारख्या पारंपारिक रोजगार सुविधांचा गिग कामगारांना मर्यादित प्रवेश असतो. त्यामुळे सामाजिक सुरक्षा ही गिग अर्थव्यवस्थेतील प्रमुख धोरणात्मक गरज आहे.

**५.५ अल्गोरिदमिक व्यवस्थापन आणि प्लॅटफॉर्मवरील अवलंबित्व**

रेटिंग, प्रात्साहन, कामाचे वाटप, किंमत निर्धारण आणि दंड यांसाठी डिजिटल प्रणालींचा वापर केला जातो. त्यामुळे कामगारांना वेळ निवडण्याची मुभा असली तरी प्लॅटफॉर्मच्या निर्णयांवर त्यांचे आर्थिक अवलंबित्व वाढते.

**५.६ लिंग आणि सामालिक आयाम**

महिला गिग कामगारांसाठी लवचिकता उपयुक्त ठरू शकते; परंतु सुरक्षितता, कौटुंबिक काळजीची जबाबदारी, सामाजिक नियम आणि अस्थिरता यांचा त्यांच्या रोजगार अनुभवावर प्रभाव पडतो.

**५.७ आर्थिक वर्तन आणि कुटुंबाची आर्थिक सुरक्षितता**

उत्पन्नातील अनिश्चिततेचा बचत, कर्ज, गुंतवणूक, विमा आणि उपभोगाच्या निर्णयांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे गिग कामगारांचा अभ्यास केवळ श्रमबाजाच्या दृष्टिने न करता आर्थिक घटक म्हणून करणे आवश्यक आहे.

**५.८ गिग कामगारांचे मापन आणि श्रम सांख्यिकी**

प्लॅटफॉर्म कामगार एकाच वेळी विविध प्लॅटफॉर्मवर काम करू शकतात आणि औपचारिक, अनौपचारिक किंवा स्वयंरोजगाराच्या श्रेणीमध्ये येऊ शकतात. त्यामुळे त्यांच्या अचूक संख्येचे आणि वैशिष्ट्यांचे मापन करणे आव्हानात्मक आहे.

**६. प्रमुख निष्कर्ष:**

१. रोजगारातील लवचिकता ही गिग कामाची प्रमुख आकर्षक बाब आहे; मात्र ती आर्थिक सुरक्षिततेची हमी देत नाही.
२. उत्पन्नातील चढ–उतार आणि कामाशी संबंधित खर्च हे भारतीय गिग कामगारांसमोरील प्रमुख आर्थिक प्रश्न आहेत.
३. दीर्घ कामाचे तास आणि अनिश्चित मागणी यामुळे आर्थिक शाश्वतता प्रभावित होऊ शकते.
४. अल्गोरिदमिक व्यवस्थापन हे प्लॅटफॉर्मवरील नियंत्रणाचे महत्वाचे माध्यम बनले आहे.
५. सामाजिक सुरक्षा, विमा पेन्शन आणि अपघात संरक्षण यांचा विस्तार आवश्यक आहे.
६. सामाजिक सुरक्षा, विमा, पेन्शन आणि अपघात संरक्षण यांचा विस्तार आवश्यक आहे.
७. उपलब्ध संशोधन महानगरांमध्ये आणि खाद्य वितरण/वाहतूक यांसारख्या काही क्षेत्रांमध्ये आधिक केंद्रित आहे.
८. गिग कामगारांचे बचत, कर्ज, खर्च आणि आर्थिक लवचिकता यावरील संशोधन तुलनेने कमी आहे.
९. गिग कामगारांची अचूक संख्या व स्वरूप मोजणसाठी श्रम सांख्यिकीमध्ये सुधारणा आवश्यक आहे.

**७. संशोधनातील पोकळी**

उपलब्ध साहित्याच्या एकत्रित अभ्यासातून काही महत्वपूर्ण संशोधन पोकळ्या स्पष्ट होतात. प्रथम, उत्पन्नातील असुरक्षिततेवर चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली असली तरी उत्पन्न, खर्च, बचत, कर्ज आणि सामाजिक सुरक्षा यांचा एकत्रित आर्थिक अभ्यास मर्यादित आहे. दुसरे म्हणजे, संशोधन मोठ्या महानगरांमध्ये केंद्रित असून जिल्हास्तरावरील व गैर महानगरी भागातील अभ्यास तुलनेने कमी

आहेत. तिसरे म्हणजे, विविध प्रकारच्या गिग कामगारांची तुलनात्मक आर्थिक स्थिती पुरेशा प्रमाणात तपासलेली नाही. चौथे म्हणजे, रोजगारातील लवचिकता आणि उत्पन्न स्थैर्य यांच्यातील संबंधाचे परिमाणात्मक परीक्षण आवश्यक आहे. पाचवे म्हणजे, दीर्घकालीन अभ्यासांची कमतरता आहे. त्यामुळे गिग कामाचा घरगुती आर्थिक सुरक्षिततेवर होणारा परिणाम अधिक सखोलपणे तपासणे आवश्यक आहे.

## ८. भविष्यातील संशोधनाची दिशा

१. म्हानगरांबाहेरील जिल्हांमध्ये गिग कामगारांचे प्राथमिक सर्वेषण करणे.

२. एकूण उत्पन्नाबराबरचे इंधन, देखभाल आणि इतर कामाशी संबंधित खर्च वजा करून निव्वळ उत्पन्न मोजणे.

३. सरासरी उत्पन्नाऐवजी उत्पन्नातील चढउतार मोजणे.

४. कामाचे तास, लवचिकता आणि आर्थिक कल्याण यांचा संबधं तपासणे.

५. बचत, कर्ज, विमा, आर्थिक नियोजन आणि कुटुंबाची आर्थिक लवचिकता तपासणे.

६. Food delivery, ride-hailing, logistics आणि home-service कामगारांची तुलनात्मक समीक्षा करणे.

७. महिला आणि पुरूष गिग कामगारांच्या उत्पन्न, सुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षा यातील फरकांचा अभ्यास करणे.

८. सरकारी व प्लॅटफॉर्मव्दारे उपलब्ध सामाजिक सुरक्षा योजनांची जागरूकता व प्रत्यक्ष लाभ तपासणे.

## ९. धोरणात्मक परिणाम

गिग अर्थव्यवस्थेसाठी धोरण तयार करताना केवह रोजगाराच्या संधीकडे पाहणे पुरेसे नाही. सामाजिक सुरक्षा ही विविध प्लॅटफॉर्मवर हस्तांतरीत करता येणारी आणि सहज उपलब्ध असेण आवश्यक आहे. कामाचे तास व कामाशी संबंधित खर्च लक्षात घेऊन योग्य मोबदल्याच्या यंत्रणा विकसित करणे गरजेचे आहे. अपघात, आरोग्य आणि वृध्दापकाळासाठी संरक्षण मजबूत करणे आवश्यक आहे. तक्रार निवारण आणि कामगार प्रतिनिधित्वाचा प्रभावी यंत्रणा असाव्यात, तसेच श्रम सांख्यिकीमध्ये प्लॅटफॉर्म कामगारांची स्वतंत्र व अचून नोंद करण्याची आवश्यकता आहे.

## १०. निष्कर्ष

गिग अर्थव्यवस्था ही रोजगाराच्या बदलत्या स्वरूपातील महत्वची घटना आहे. उपलब्ध साहित्यावरून असे दिसते की, गिग कामामुळे लवचिकता, रोजगाराच्या संधी आणि अतिरिक्त उत्पन्न उपलब्ध होते; परंतु त्यासोबत उत्पन्नातील अनिश्चितता, प्लॅटफॉर्मवरील अवलंबित्व, अल्गोरिदमिक नियंत्रण, रोजगार असुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव यासारखी आव्हाने ही आहेत. या समीक्षा लेखाचा मुख्य निष्कर्ष असा आहे की, रोजगारातील लवचिकता आणि उत्पन्न स्थैर्य हे समान परिणाम मानता येत नाहीत. कामगाराला वेळ निवडण्याचे स्वातंत्र्य असले तरी त्याचे उत्पन्न अनिश्चित, कामाचा खर्च जास्त आणि सामाजिक सुरक्षा मर्यादित असू शकते. त्यामुळे भविष्यातील आर्थिक संशोधनात आर्थिक सुरक्षितता ही व्यापक संकल्पना वापरून उत्पन्न, खर्च, बचत, कर्ज, विमा, सामाजिक सुरक्षा आणि कुटुंबाचे आर्थिक कल्याण यांचा एकत्रित अभ्यास करणे आवश्यक आहे विशेषत: अमरावतीसारख्या व गैर महानगरी भागातील प्राथमिक संशोधन विद्यमान साहित्याला महत्वपूर्ण योगदान देऊ शकते.

## ११. संदर्भ:


1. Afsharinia, B., & Gurtoo, A. (2026). Cross-sectional dataset of low- and semi-skilled gig workers in India: COVID-19 and human security. Data in Brief, 66, 112892. DOI: 10.1016/j.dib.2026.112892.
2. Alauddin, M., et al. (2024/2025). The Influence of Digital Platforms on Gig Workers: A Systematic Literature Review. Heliyon. DOI: 10.1016/j.heliyon.2024.e41491.
3. De Neve, G., Medappa, K., & Prentice, R. (2023). India's Gig Economy Workers at the Time of Covid-19: An Introduction. Contributions to Indian Sociology. DOI: 10.1177/00731741231182759.
4. Duggan, J., Sherman, U., Carbery, R., & McDonnell, A. (2020). Algorithmic Management and App-work in the Gig Economy. Human Resource Management Journal, 30(1), 114–132. DOI: 10.1111/1748-8583.12258.

5. Dunn, M. (2020). Making Gigs Work: Digital Platforms, Job Quality and Worker Motivations. New Technology, Work and Employment. DOI: 10.1111/ntwe.12167.
6. Faras, F., Mehta, B. S., & Datta, A. (2025). Platform-based Gig Work in India's Labour Statistics. Indian Journal of Labour Economics, 68(1). DOI: 10.1007/s41027-025-00566-0.
7. Ghosh, A., Zaidi, M., & Ramachandran, V. (2022). Locating Women Workers in the Platform Economy in India. Gender & Development. DOI: 10.1080/13552074.2022.2131258.
8. Masta, S., & Kaushiva, S. (2024). Work in the Platform Economy: A Systematic Literature Review. Employee Relations. DOI: 10.1108/ER-12-2023-0638.
9. Medappa, K. (2025). ‘Lived Capitalisation’: How Speculative Finance Shapes the Social and Financial Lives of ‘Gig’ Workers in Bengaluru, India. Work, Employment and Society. DOI: 10.1177/09500170251343277.
10. Malhotra, P., & Agrawal, M. (2025). Dislike and Survival: Work-Related Dynamics of Gig Platform Workers in India. New Technology, Work and Employment, 40, 351–367. DOI: 10.1111/ntwe.12337.
11. Nair, S. (2023). The Political Economy of Gig Work in the Pandemic. Contributions to Indian Sociology. DOI: 10.1177/00697741231202185.
12. NITI Aayog. (2022). India's Booming Gig and Platform Economy: Perspectives and Recommendations on the Future of Work. Government of India.
13. O'Farrell, R., & Montagnier, P. (2020). Measuring Digital Platform-mediated Workers. New Technology, Work and Employment. DOI: 10.1111/ntwe.12155.
14. Pant, J. J., & Guha Majumder, M. (2022). Themes and Narratives of Gig Economy: An Indian HR Perspective. NHRD Network Journal. DOI: 10.1177/26314541211064751.
15. Ramakrishnappa, V. (2026). Booming Gig Workforce in India: Opportunities and Challenges. World Journal of Advanced Research and Reviews, 29(3), 1125–1131. DOI: 10.30574/wjarr.2026.29.3.0651.
16. Rani, U., & Dhir, R. K. (2020). Platform Work and the COVID-19 Pandemic. Indian Journal of Labour Economics. DOI: 10.1007/s41027-020-00273-y.
17. Ray, S., et al. (2024). Jobs and Careers in the New Normal: A Systematic Review of GIG Work Research Since the Covid-Pandemic. South Asian Journal of Management, 31(1), 29–59. DOI: 10.62206/sajm.31.1.2024.29-59.
18. Sharma, A. K., & Sharma, R. (2025). The Gig Economy and the Evolving Nature of Work in India. Journal of Digital Economy, 4, 156–167. DOI: 10.1016/j.jdec.2025.07.005.
19. Sinha, D., & Pandit, D. (2023). Assessing the Economic Sustainability of Gig Work: A Case of Hyper-local Food Delivery Workers in Kolkata, India. Research in Transportation Economics. DOI: 10.1016/j.retrec.2023.101335.
20. Vallas, S., & Schor, J. B. (2020). What Do Platforms Do? Understanding the Gig Economy. Annual Review of Sociology, 46, 273–294. DOI: 10.1146/annurev-soc-121919-054857.
21. Wood, A. J., Graham, M., Lehdonvirta, V., & Hjorth, I. (2019). Good Gig, Bad Gig: Autonomy and Algorithmic Control in the Global Gig Economy. Work, Employment and Society, 33(1), 56–75. DOI: 10.1177/0950017018785616.